



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १४५। किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । १६/०६/२०२६ । पाने - ६




# कारवाईच्या भीतीने 'शटर' डाऊन तर काही ठिकाणी विक्रीच बंद

## तुकाराम मुंढेंचा धसका! दुकानातून सुटे खाद्यतेल गायब

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - राज्याच्या अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर भेसळयुक्त अन्नपदार्थ, दूध आणि औषधांविरोधातील कारवाईला वेग आला आहे. राज्यभर सुरू असलेल्या या मोहिमेचे पडसाद आता ग्रामीण भागातही उमटू लागले असून अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात किराणा दुकानांमधून सुट्या खाद्यतेलाची विक्री जवळपास बंद झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत असून, आतापर्यंत आपण नेमकं काय खात होतो? असा सवाल अनेकजण उपस्थित करत आहेत.



• गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातील किराणा दुकानांत ग्राहकांना गरजेनुसार अर्धा लिटर, एक लिटर किंवा त्यापेक्षा कमी प्रमाणात सुटे खाद्यतेल विकले जात होते. मात्र गेल्या महिनाभरात परिस्थितीत अचानक बदल झाला आहे. आता बहुतांश दुकानदार ग्राहकांना थेट कंपनी पॅक असलेल्या एक, पाच किंवा दहा लिटरच्या खाद्यतेलाच्या पिशव्या अथवा डबेच देत आहेत. सुट्या तेलाची विक्री जवळपास बंद झाल्याने यामागे भेसळविरोधी कारवाईची धास्ती असल्याची चर्चा सुरू झाली आहे. तेलाच्या चवीत आणि गुणवत्तेत बदल जाणवत असल्याचे काही ग्राहकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पूर्वी विकले जाणारे सुटे तेल नेमके कोणत्या प्रकारचे होते, त्यामध्ये भेसळ तर नव्हती ना, अशी शंका ग्राहकांकडून व्यक्त केली जात आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या माहितीनुसार, भेसळयुक्त खाद्यतेलामध्ये पामतेल, आर्गेमोन तेल, खनिज तेल, वापरलेले तेल तसेच कृत्रिम सुगंधी द्रव्यांचा वापर केला जातो. अशा तेलाचे सेवन दीर्घकाळ केल्यास हृदयविकार, रक्तदाबातील समस्या, रक्ताची घनता वाढणे, त्वचारोग, अपचन तसेच हार्ट अटॅकसारखे गंभीर परिणाम होऊ शकतात. विशेषतः हॉटेल्स, फास्ट फूड सेंटर, लग्नसमारंभ आणि मोठ्या भोजन कार्यक्रमांमध्ये अशा तेलाचा वापर अधिक प्रमाणात होत असल्याचे यापूर्वीच्या तपासांमध्ये समोर आले आहे.

# रामकथेतून भक्ती, त्याग आणि समर्पणाचा संदेश

## भाविकांच्या अलोट गर्दीत ढोक महाराजांच्या वाणीतून जयघोष

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रामभक्ती, तपश्चर्या आणि ईश्वरनिष्ठेचे महत्त्व विशद करतांना पूजनीय गगनगिरी महाराज आमचे राम आहेत. गगनगिरी बाबा हे या युगातील आत्मिक आणि आध्यात्मिक चमत्कार आहेत, असे गौरवोद्गार काढत त्यांनी रामकथेला एका वेगळ्या उंचीवर नेले.



स्व. जयवंतराव व बाळासाहेब गुंजाळ यांच्या गुंजाळ मळयात सुरू असलेल्या परमपूज्य स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहात रामायणाचार्य ढोक महाराज यांच्या भावस्पर्शी वाणीतून रामकथेचे निरूपण होत असून संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला आहे. रामकथेतील शबरी, जटायू, संपाती, हनुमान आणि विभीषण यांच्या प्रसंगांचे निरूपण करताना ढोक महाराजांनी भक्ती, त्याग, सेवा आणि समर्पण यांचा जीवनाशी संबंध जोडला. शबरीच्या अखंड भक्तीचे वर्णन करताना त्यांनी मातंग ऋषींच्या आशीर्वादाने प्रभू रामांच्या प्रतीक्षेत संपूर्ण आयुष्य व्यतीत करणाऱ्या शबरीचे चरित्र उलगडले. शबरीकडे पात्र नव्हते, वैभव नव्हते, पण प्रभूंचे चरण धुण्याची पात्रता तिच्या अंत:करणात होती. शबरी ही केवळ एक भक्त नव्हती, तर तिच्यात कौशल्या मातेचे वात्सल्य दडलेले होते असे सांगत त्यांनी भक्तीचे खरे स्वरूप स्पष्ट केले. मेरी झोपडी के भाग आज खुल जाएंगे, राम आएंगे या भावगीताच्या ओळींनी कथासागरात भाविक डुंबून जातांना वातावरण भारावून गेले.

संपाती आणि जटायू यांच्या त्यागमय प्रसंगाचे वर्णन करताना त्यांनी रामनामाच्या सामर्थ्याचा उल्लेख केला. प्रभू श्रीरामांच्या कार्याशी संबंध आल्यावर संपातीच्या पंखात आणि जीवनातच पुन्हा चैतन्य निर्माण झाले. दिव्य दृष्टी प्राप्त असलेला संपाती सामर्थ होय. रामनामाच्या स्मरणाने प्रत्येकाच्या जीवनात चैतन्य जागृत होते आणि रामकृपा हीच खरी नवसंजीवनी आहे, असा संदेश ढोक महाराजांनी दिला. पुढे लंकेच्या प्रवेशद्वारावरील लंकिनी राक्षसी, अशोकवाटिकेतील सीतामातेची अवस्था आणि हनुमंतांच्या पराक्रमाचे प्रभावी वर्णन करत त्यांनी धर्माच्या विजयाची महती सांगितली.

रामकथेत अयोध्याकांडाचे महत्त्व विशद करताना ढोक महाराज म्हणाले, एका भावाला भावाचे दर्शन नाही, तर दुसऱ्या भावाला आईचे दर्शन नाही; तरीही धर्म आणि मर्यादा जपणारी ही पात्रे आजच्या समाजासाठी आदर्श आहेत. मोठ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाकडे आणि संस्कारांकडे पाहण्याचा संदेश देत त्यांनी प्रभू श्रीरामांचे चरित्र मानवजातीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. त्यांच्या विश्लेषणात्मक आणि हृदयस्पर्शी निरूपणाने उपस्थित भाविक अक्षरशः भावविभोर झाले.

# सरकारच्या आश्वासनानंतर रोहित पवारांचे उपोषण मागे

पंढरपूर (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी आणि कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करण्याच्या मागणीसाठी पंढरपुरात सुरू केलेले राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांचे 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलन अखेर मागे घेण्यात आले. राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलनस्थळी भेट देत सरकारच्या वतीने शिष्टाई केली. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांसोबत सविस्तर चर्चा करून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर रोहित पवार यांनी तिसऱ्या दिवशी आपले आंदोलन मागे घेतले. या आंदोलनाला राज्यभरातील शेतकरी आणि विविध संघटनांचा मोठा पाठिंबा मिळाला होता.

ट्विट करत रोहित पवारांनी सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, सरकारने शेतकरी कर्जमाफी योजनेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' यांचे नाव दिले, परंतु त्यात अशा जाचक अटी टाकल्या ज्यामुळे बहुतांश शेतकरी वंचित राहणार होते. हा एकप्रकारे पुण्यश्लोक अहिल्यादेवींचाच अवमान होता आणि हीच गोष्ट आम्ही आंदोलनातून सरकारच्या निदर्शनास आणून दिली. सुरुवातीला अटी बदलण्यास नकार देणारे सरकार आता या अटी काढण्यास तयार झाले, हेच या आंदोलनाचे मोठे यश आहे.

# ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य : ना. राधाकृष्ण विखे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यातील अपुऱ्या पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर तसेच धरणातील उपलब्ध पाणीसाठा विचारात घेवून ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहे. बेकायदेशिर पाणी उपश्यावरही तातडीने कडक कारवाई करण्याच्या सुचना त्यांनी विभागाच्या आधिकाऱ्यांना दिल्या.

सिंचन भवनामध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत कृष्णा व गोदावरी लाभक्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या धरणांमधील पाणीसाठा, अगामी मान्सुनची परिस्थिती या संदर्भात महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीला कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हनमंत धुमाळ, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयवंत गवळी यांच्यासह मुख्य अभियंता, अधिक्ष

सद्य परिस्थितीत राज्यातील धरणांमधील एकुण उपयुक्त जलसाठा ३५७.५ टिएमसी (२५ टक्के) असून, तो गतवर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आले. यावर्षीचे पर्जन्यमान आता पर्यंत अत्यल्प झाल्यामुळे धरणात पाणी आले नाही हे त्यामागील प्रमुख कारण आहे. विशेषत: पुणे विभागातील उपयुक्त जलसाठा गतवर्षीच्या तुलनेक कमी असल्याने परिस्थिती गांभिर्याने हाताळावी असे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिले. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगर क्षेत्रातील सुमारे ८५ लाख नागरीकांना ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याचे पाणी उपलब्ध राहण्यासाठी आवश्यक असलेले पाणी राखीव ठेवण्याच्या सुचना या बैठकीत मंत्र्यांनी प्राधान्याने दिल्या आहेत. मराठावाडा आणि कृष्णा महामंडळाच्या अंतर्गत येणारे सर्व धरणं, जलाशय व प्रमुख जलस्त्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा



घ्यावा, त्यावर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा विचार करुन पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक राखीव कोटा निश्चित करण्याबाबतही बैठकीत जलसंपदा मंत्र्यानी सुचित केले. जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पाणीपुरवठा यंत्रणा यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून पाणी व्यवस्थापनाचा कृती आराखडा तातडीने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले.

नाशिक, अहिल्यानगर व मराठवाडा विभागातील जलसाठ्याचा आढावा घेताना नाशिक विभागात सध्या २६ टक्के तर मराठवाडा विभागात २८ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध असून, दोन्हीही विभागातील प्रकल्पांमध्ये अपेक्षित प्रमाणात पावसाची नोंद झालेली नाही. विशेषत: मराठवाडा आणि अहिल्यानगर (पान ४ वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# प्रशांत महासागर तापला, महाराष्ट्राची चिंता वाढली

# एल निनो विरुद्ध मान्सून; यंदाचा पावसाळा कसोटीवर

जगातील हवामान व्यवस्था अत्यंत गुंतागुंतीची आणि परस्परांशी जोडलेली आहे. पृथ्वीवरील महासागर, वातावरण, वारे, तापमान, पर्जन्यमान आणि ऋतू यांचा एकमेकांशी अतिशय जवळचा संबंध असतो. जगाच्या एका टोकाला घडणारा बदल हजारो किलोमीटर दूर असलेल्या प्रदेशाच्या हवामानावर परिणाम करू शकतो. अशाच प्रकारची एक महत्त्वाची हवामान घटना म्हणजे एल निनो. गेल्या काही दशकांत हवामानशास्त्रज्ञ, कृषी तज्ज्ञ, जलसंपदा नियोजक आणि अर्थतज्ज्ञ यांच्यासाठी एल निनो हा अभ्यासाचा महत्त्वाचा विषय बनला आहे. कारण प्रशांत महासागरात निर्माण होणाऱ्या या प्रक्रियेचा प्रभाव जगभरातील तापमान, पर्जन्यमान, वादळे, दुष्काळ, पूर आणि शेती उत्पादनावर दिसून येतो. भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी तर एल निनोचे महत्त्व अधिक आहे, कारण देशातील कोट्यवधी लोकांचे जीवन आणि अर्थव्यवस्था मान्सूनवर अवलंबून आहे.



एल निनो ही संज्ञा स्पॅनिश भाषेतून आलेली आहे. एल निनो म्हणजे लहान मुलगा किंवा ख्रिस्त बालक. दक्षिण अमेरिकेतील पेरू आणि इक्वेडोरच्या किनारपट्टीवर राहणाऱ्या मच्छीमारांनी या घटनेची ओळख सर्वप्रथम केली होती. दर काही वर्षांनी ख्रिसमसच्या सुमारास समुद्राचे तापमान वाढत असल्याचे त्यांना जाणवले. या असामान्य तापमानवाढीमुळे मासेमारीवर परिणाम होत असे. त्यामुळे त्यांनी या घटनेला एल निनो असे नाव दिले. पुढे हवामानशास्त्राच्या प्रगतीमुळे या घटनेचा सखोल अभ्यास झाला आणि ती जागतिक हवामानावर परिणाम करणारी महत्त्वाची प्रक्रिया असल्याचे स्पष्ट झाले.

सामान्य परिस्थितीत प्रशांत महासागराच्या पश्चिम भागात, विशेषतः इंडोनेशिया आणि ऑस्ट्रेलियाच्या आसपास, समुद्राचे पाणी तुलनेने उबदार असते. पूर्व प्रशांत महासागरात, म्हणजे दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यालगत, पाणी तुलनेने थंड असते. या तापमानातील फरकामुळे पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणारे व्यापार वारे सक्रिय राहतात. हे वारे उबदार पाणी पश्चिमेकडे ढकलतात आणि त्यामुळे पश्चिम प्रशांत महासागरात ढगांची निर्मिती व पर्जन्य वाढतो. परंतु काही विशिष्ट वर्षांत हे व्यापार वारे कमकुवत होतात किंवा त्यांची दिशा बदलते. परिणामी उबदार पाणी पूर्वेकडे सरकू लागते आणि मध्य व पूर्व प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते. हीच स्थिती म्हणजे एल निनो.

एल निनो हा केवळ समुद्राच्या तापमानातील बदल नाही. तो वातावरण आणि महासागर यांच्यातील परस्परसंवादाचा परिणाम असतो. समुद्राचे तापमान वाढल्यामुळे वातावरणातील दाबाचे क्षेत्र बदलतात. वाऱ्यांचे स्वरूप बदलते. ढगांची निर्मिती आणि पर्जन्यमानाच्या पद्धती बदलतात. परिणामी जगभरातील हवामानावर त्याचे दूरगामी परिणाम दिसून येतात. काही भागांत अतिवृष्टी होते, तर काही भागांत तीव्र दुष्काळ पडतो. काही प्रदेशांत तापमान विक्रमी वाढते, तर काही ठिकाणी वादळांची संख्या वाढते.

एल निनोचा अभ्यास करताना एल निनो सदर्न ऑसिलेशन अर्थात एछडज या संकल्पनेचा उल्लेख केला जातो. एछडज ही महासागर आणि वातावरण यांच्यातील परस्परसंवादाची मोठी प्रणाली आहे. यामध्ये एल निनो, ला नीना आणि न्यूट्रल अवस्था असे तीन टप्पे असतात. एल निनोच्या काळात समुद्राचे तापमान सरासरीपेक्षा जास्त असते, तर ला नीना काळात ते सरासरीपेक्षा कमी असते. न्यूट्रल अवस्थेत तापमान सामान्य पातळीवर असते. या तीन अवस्थांमुळे जगभरातील हवामानात विविध प्रकारचे बदल होत असतात.भारतासाठी एल निनोचे महत्त्व मुख्यतः मान्सूनमुळे आहे. भारतातील वार्षिक पर्जन्यमानापैकी सुमारे ७० टक्के पाऊस नैऋत्य मान्सूनद्वारे पडतो. शेती, पिण्याचे पाणी, उद्योग, जलविद्युत निर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांचा पाया या पावसावर आधारित आहे. त्यामुळे मान्सूनमध्ये होणाऱ्या कोणत्याही बदलाचा थेट परिणाम देशाच्या विकासावर होतो. एल निनोच्या काळात भारतीय मान्सून कमकुवत होण्याची शक्यता वाढते. कारण प्रशांत महासागरातील तापमानवाढ वातावरणातील दाब आणि वाऱ्यांच्या प्रणालींमध्ये बदल घडवून आणते. यामुळे भारतीय उपखंडाकडे येणाऱ्या आर्द्रतेचे प्रमाण कमी होऊ शकते.

इतिहासातील अनेक वर्षे याचे उदाहरण आहेत. १९७२, १९८२, १९८७, २००२, २००९ आणि २०१५ या वर्षांमध्ये तीव्र एल निनोची नोंद झाली होती. या काळात भारतातील अनेक भागांत पर्जन्यमान कमी झाले होते. काही वर्षांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. अर्थात प्रत्येक एल निनो वर्षात दुष्काळ पडतोच असे नाही. मान्सूनवर परिणाम करणारे इतरही अनेक घटक असतात. मात्र तीव्र एल निनो असताना कमी पावसाची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते.

महाराष्ट्रासाठी एल निनोचे परिणाम अधिक गंभीर ठरू शकतात. राज्यातील मोठा भाग पावसावर आधारित शेती करतो. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांमध्ये खरीप पिकांसाठी वेळेवर आणि पुरेसा पाऊस आवश्यक असतो. जर मान्सून उशिरा आला किंवा पावसात खंड पडला तर पेरणी उशिरा होते. अनेक वेळा दुबार पेरणीची वेळ येते. बियाणे, खते आणि मशागतीवर झालेला खर्च वाढतो. उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी आणि भात यांसारखी खरीप पिके पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास या पिकांच्या उत्पादनावर परिणाम होतो. कमी उत्पादनामुळे बाजारातील पुरवठा घटतो आणि काही कृषी मालांच्या किंमती वाढू शकतात. याचा परिणाम ग्राहकांवरही होतो. अन्नधान्य महाग होण्याची शक्यता वाढते.

पावसाचे कमी प्रमाण धरणे आणि जलाशयांवरही परिणाम करते. महाराष्ट्रातील अनेक धरणे मान्सूनच्या पाण्यावर भरली जातात. जर पर्जन्यमान कमी राहिले तर धरणांतील पाणीसाठा अपेक्षेपेक्षा कमी राहू शकतो. त्याचा परिणाम पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर होतो. अनेक शहरांमध्ये आणि गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. शेतीसाठी उपलब्ध सिंचनाचे पाणीही कमी पडू शकते. परिणामी रब्बी हंगामातील पिकांवरही त्याचा परिणाम होतो.एल निनोचा प्रभाव केवळ पावसापुरता मर्यादित नसतो. तापमानातही वाढ होण्याची शक्यता असते. उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात. उन्हाळ्यात तापमान विक्रमी पातळीवर जाऊ शकते. यामुळे मानवी आरोग्यावर परिणाम होतो. विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि मैदानी काम करणाऱ्या व्यक्तींना उष्माघाताचा धोका वाढतो. जनावरांवरही त्याचा परिणाम होतो. दूध उत्पादन कमी होऊ शकते. पशुधनासाठी चारा आणि पाण्याची समस्या निर्माण होऊ शकते.

जंगल क्षेत्रावरही एल निनोचा प्रभाव जाणवतो. कोरडे वातावरण आणि वाढलेले तापमान यामुळे वनव्यांचा धोका वाढतो. जंगलातील जैवविविधतेवर त्याचा परिणाम होऊ शकतो. वन्यजीवांच्या अधिवासावर परिणाम होतो. काही भागांत स्थलांतराचे प्रमाण वाढू शकते. भारतीय अर्थव्यवस्थेवर एल निनोचा प्रभाव बहुआयामी असतो. शेती उत्पादन घटल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दबाव येतो. शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते. कृषी क्षेत्राशी संबंधित उद्योगांवर परिणाम होतो. अन्नधान्याच्या किंमती वाढल्यास महागाई वाढू शकते. महागाई नियंत्रणासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँकेला अतिरिक्त उपाययोजना कराव्या लागू शकतात. त्यामुळे आर्थिक वाढीच्या दरावरही परिणाम होऊ शकतो.

वीज निर्मिती क्षेत्रालाही एल निनोचा फटका बसू शकतो. भारतातील अनेक जलविद्युत प्रकल्प धरणांतील पाण्यावर अवलंबून असतात. पाणीसाठा कमी राहिल्यास वीज निर्मिती कमी होऊ शकते. त्याची भरपाई करण्यासाठी इतर ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवावा लागू शकतो. त्यामुळे उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता असते.जागतिक स्तरावर पाहिले तर एल निनोचे परिणाम विविध स्वरूपात दिसून येतात. दक्षिण अमेरिकेतील काही भागांत अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण होते. ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशियामध्ये दुष्काळाची शक्यता वाढते. आफ्रिकेतील काही प्रदेशांमध्ये अन्नधान्य उत्पादन घटते. उत्तर अमेरिकेत हवामानाच्या पद्धती बदलतात. त्यामुळे एल निनो ही खऱ्या अर्थाने जागतिक हवामान घटना आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर एल निनोचे महत्त्व आणखी वाढले आहे. पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत असल्याने समुद्राचे तापमानही वाढत आहे. अनेक संशोधनांनुसार भविष्यात तीव्र एल निनो घटनांची वारंवारता वाढू शकते. त्यामुळे दुष्काळ, पूर, उष्णतेच्या लाटा आणि हवामानाशी संबंधित इतर संकटांचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त केली जाते. हवामान बदल आणि एल निनो यांचा संयुक्त परिणाम जगासाठी मोठे आव्हान निर्माण करू शकतो.

यंदा हवामान संस्थांनी एल निनो सक्रिय झाल्याची घोषणा केली आहे. काही अंदाजांनुसार हा एल निनो गेल्या अनेक दशकांतील सर्वाधिक तीव्र घटनांपैकी एक ठरू शकतो. त्यामुळे भारतातील मान्सूनवर त्याचा प्रभाव पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मान्सूनचे आगमन, त्याची प्रगती, पावसाचे वितरण आणि पावसातील खंड यावर एल निनोचा परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांचा विचार करणे, जलसंधारणावर भर देणे, सूक्ष्म सिंचन पद्धतींचा अवलंब करणे आणि हवामान अंदाजांवर आधारित निर्णय घेणे आवश्यक ठरते. शासनानेही जलसाठ्यांचे व्यवस्थापन, दुष्काळ नियोजन, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि कृषी सल्ला सेवा यांवर विशेष भर देण्याची गरज आहे.


पावसाचा प्रत्येक थेंब साठवण्याची मानसिकता विकसित करणे ही काळाची गरज आहे. शेततळी, बंधारे, जलसंधारण प्रकल्प आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवाव्या लागतील. ग्रामीण भागात पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृती करणेही आवश्यक आहे.

एल निनो ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी तिचे परिणाम गंभीर असू शकतात. त्यामुळे वैज्ञानिक माहितीचा प्रसार, अचूक हवामान अंदाज, तंत्रज्ञानाचा वापर आणि योग्य नियोजन यांच्या साहाय्याने त्याचे दुष्परिणाम कमी करता येऊ शकतात. आजच्या काळात हवामानातील अनिश्चितता वाढत असताना एल निनोसारख्या घटनांचा अभ्यास आणि त्यावरील तयारी ही केवळ हवामानशास्त्राची गरज नसून शेती, अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि समाजाच्या शाश्वत भविष्यासाठी अत्यावश्यक बाब बनली आहे. एल निनो आपल्याला निसर्गातील परस्परसंबंधांची जाणीव करून देतो. प्रशांत महासागरातील तापमानातील बदल महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनावर परिणाम करू शकतो, हेच या घटनेचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच एल निनोचा अभ्यास, त्याचे परिणाम आणि त्यावरील उपाययोजना समजून घेणे ही आजच्या काळातील मोठी आवश्यकता ठरली आहे.

## एल निनो म्हणजे काय?

**एल निनो म्हणजे प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढण्याची नैसर्गिक हवामान प्रक्रिया होय. सामान्य परिस्थितीत पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहणारे व्यापार वारे उबदार पाणी आशियाच्या दिशेने ढकलतात. मात्र, एल निनोच्या काळात हे वारे कमकुवत होतात आणि उबदार पाणी प्रशांत महासागराच्या मध्य व पूर्व भागात पसरते. यामुळे वातावरणातील दाब, वाऱ्यांचे स्वरूप आणि पर्जन्यमानाच्या पद्धतींमध्ये मोठे बदल होतात. एल निनोचा प्रभाव केवळ प्रशांत महासागरापुरता मर्यादित राहत नाही, तर जगभरातील हवामानावर त्याचा परिणाम होतो. काही देशांमध्ये अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण होते तर काही भागांमध्ये तीव्र दुष्काळ पडतो. भारतात एल निनोचा सर्वात मोठा परिणाम मान्सूनवर दिसून येतो. एल निनो सक्रिय असताना सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वाढते. त्यामुळे शेती, पिण्याचे पाणी, धरणांतील साठा, वीज निर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. विशेषतः महाराष्ट्रासारख्या पावसावर अवलंबून असलेल्या राज्यात एल निनोमुळे खरीप हंगामावर परिणाम होण्याची भीती असते. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास पेरणी उशिरा होणे, उत्पादन घटणे, पाणीटंचाई निर्माण होणे आणि दुष्काळसदृश परिस्थिती उद्भवणे यांसारखी आव्हाने निर्माण होऊ शकतात. त्यामुळे हवामान तज्ज्ञ, शेतकरी आणि प्रशासन एल निनोच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवत असतात. एल निनो ही केवळ समुद्रातील तापमानवाढ नसून जागतिक हवामानाचे गणित बदलणारी एक महत्त्वाची नैसर्गिक घटना आहे.**

## एल निनो संकटासमोर शेतकऱ्यांनी सावध राहावे - डॉ. अशोकराव ढगे



**एल निनो २०२६ जगावर १७० वर्षांनी पुनश्च मोठे संकट आले आहे. धोरणात्मक कृषी निर्णय आवश्यक. नवीन आडसाली उसाची लागवड करू नये. खरीप हंगामात बाजरीचे देशी वाण वापरावेत. बाजरीला कमी पाणी लागते त्यामध्ये मिश्र पीक घ्यावे. खरीप हंगामात ज्वारी पीक घेतल्यास चारा सुद्धा मिळू शकेल. कपाशी काही ठिकाणी लागवड झाली आहे तथापि नवीन लागवड करताना देशी वाण कमी मुदतीचा घ्यावा. पाण्याचे शेतामध्ये नियोजन प्रत्येक थेंबावर जास्त पीक हा विचार करावा. शहरामध्ये पाण्याचा वापर मर्यादित व काटकसरीने करावाच लागेल त्यासाठी जागृती आवश्यक आहे. ७५ ते १०० ा पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये अन्यथा दुबार पेरणीचे संकट येऊ शकते. सेंद्रिय खताचा शक्य तेवढा वापर व वाढवावा रासायनिक खते अत्यल्प व फवारणी द्वारे शक्य तेथे द्यावीत ड्रोन मुळे कमी पाणी लागते त्याचाही विचार उच्च तंत्रज्ञान म्हणून करावा. युरिया खत जमिनीद्वारे न देता फवारणी द्वारे द्यावे रान बांधणी मध्ये बीबीएफ चा वापर महत्त्वाचा आहे. पाण्याचा ताण सहन करणारीच पिके घ्यावीत . सोयाबीन पाण्याचा ताण सहन करू शकत नाही ते संवेदनशील पीक आहे त्यातील योग्य वाणाचा विचारपूर्वक वापर करावा. तुरीचे संकरित वाणापेक्षा कमी कालावधीचे देशी वाण वापरावेत. पेरणीनंतर तंत्रज्ञानाचा वापर करताना कृषी खाते व कृषी विद्यापीठांचा सल्ला घ्यावा. जग भारत देश व त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये पाण्याचे संकट मोठे आले आहे महाराष्ट्रातील प्रकल्प वर्षा प्रयोग तातडीने राबवावा असा सल्ला कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे यांनी दिला आहे.**

## छेडछाडीला कंटाळून अल्पवयीन विद्यार्थिनीचा आत्महत्येचा प्रयत्न

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या १५ वर्ष १ महिना वयाच्या अल्पवयीन विद्यार्थिनीने दररोज होणाऱ्या छेडछाडीच्या प्रकारामुळे त्रस्त होऊन विषारी पदार्थ सेवन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना संगमनेर तालुक्यातील एका गावात घडली आहे. तिला तातडीने उपचारार्थ लोणीच्या प्रवरा रुग्णालयात दाखल केल्याने, तिच्या जीवावरचे संकट टळले असून तिची प्रकृती सुधारत आहे.

या बाबत अधिक माहिती अशी, तालुक्यातील एका गावात दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीची गावातीलच एक जण छेड काढत होता. सातत्याने होणाऱ्या या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या त्या पीडितेने अखेर टोकाचे पाऊल उचलून आपल्या गावाच्या शिवारातील राहत्या घरात किटकनाशक प्राशन केल्याची घटना १० जून २०२६ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. तिच्या सुदैवाने तिला तातडीने रुग्णालयात दाखल केल्याने तिचे प्राण वाचले. मात्र याबाबत तिच्या पालकांना समजल्याने पीडित मुलीच्या आईने संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७८ (१) तसेच बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोस्को) च्या कलम ११ (१), १२ नुसार गुन्हा दाखल केला असून, आरोपीला अटक केली आहे. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता त्यास मंगळवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रविण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली उप निरीक्षक शलमोन सातपुते करीत आहेत.

## ना. विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपचा गो-सेवा उपक्रम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी संगमनेर शहर मंडळाच्या वतीने संगमनेर येथील पांजरपोळमध्ये गो-सेवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय संस्कृतीतील गोमातेचे महत्त्व जपत तसेच समाजसेवेचा संदेश देत हा उपक्रम पार पडला.

संगमनेर शहर मंडळाच्या अध्यक्षा पायल ताजणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात गोमातांना चारा वाटप करण्यात आले तसेच पांजरपोळ संस्थेला सहकार्य करण्यात आले. समाजसेवा आणि संस्कार यांचा संगम साधणारा हा उपक्रम कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वी ठरला.

यावेळी उपस्थितांनी मंत्री राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्यात होत असलेल्या विकासकामांचा गौरव केला. जलसंपदा, शेती, ग्रामीण विकास आणि जनहिताच्या विविध योजनांमधून त्यांनी राज्याच्या विकासाला दिलेली गती उल्लेखनीय असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



कार्यक्रमास महिला शहराध्यक्षा ज्योतीताई भोर, अरुणा पवार, मनीषा कांबळे, भारत गवळी, दिलीप रावल, शुभम लहामगे, विशाल यनगंदुल, सुधाकर गुंजाळ, आशिष ताजणे, मुकुंद उपरे, कैलास वाघमारे, अमित गुप्ता, श्याम कोळपकर, आकाश सहाणे, लखन सूर्यवंशी, अविनाश फटांगरे, अरुण कुलकर्णी, किशोर भांड, आबा सोनवणे, अशोक ननवरे, संदेश गायकवाड, कैलास जेडगुले आणि संतोष शिंदे उपस्थित होते.

सेवेतून संस्कार, संस्कारातून समाजहित या भारतीय जनता पार्टीच्या विचारधारेचा प्रत्यय देणारा हा उपक्रम ठरला.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# 'देऊळ बंद 2' निमित्ताने अभिनेते प्रवीण तरडे लोणीत प्रेक्षकांच्या भेटीला



युवावार्ता (प्रतिनिधी)

लोणी - मराठी चित्रपट सृष्टीत आपल्या अनोख्या दिग्दर्शन आणि अभिनय शैलीने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे सुप्रसिद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक प्रविण तरडे हे त्यांच्या आगामी बहुप्रतिक्षित 'देऊळ बंद २: आता परीक्षा देवाची' या चित्रपटाच्या निमित्ताने प्रेक्षकांच्या थेट लोणी येथील नाथगंगा चित्रपट गृहात प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. या विशेष दौऱ्याचे आयोजन १३ जून २०२६ रोजी रात्री बारा वाजता वाजता करण्यात आले असून, प्रविण तरडे यांच्यासह चित्रपटाची संपूर्ण टीम प्रेक्षकांशी संवाद साधण्यासाठी खास लोणी येथील नाथगंगा चित्रपटगृह रसिकांसाठी आपल्या लाडक्या कलाकारांना प्रत्यक्ष डोळ्यांसमोर पाहण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची ही एक अभूतपूर्व सुवर्णसंधी प्रेक्षकांसाठी दिली होती.

हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून, यामध्ये शेतकऱ्यांच्या जीवनप्रसंगात येणाऱ्या विविध अडचणी आणि संकटांवर अतिशय स्पष्ट व सविस्तरपणे प्रकाश टाकण्यात आला आहे. ग्रामीण भागातील ज्वलंत प्रश्न अत्यंत स्पष्ट स्वरूपात आणि संवाद व प्रसंगानुरूप मांडण्यात आले आहेत. विशेषतः शेतकऱ्यांच्या पिकांचा विमा, बाजारातील पिकांना मिळणारा भाव आणि सावकारांचा पाश यांसारख्या गंभीर विषयांना कथानकात अत्यंत गांभीर्याने हाताळण्यात आले आहे. या सर्व कठीण प्रश्नांची उकल करण्यासाठी आणि या संकटांतून मार्ग काढण्यासाठी 'स्वामींनी' देखील यामध्ये महत्वपूर्ण भूमिका भेट शेतकऱ्यांमध्ये राहून त्यांचे जीवन कसे याची प्रचिती देखील दिसून येते दिसून येते. शेतकरी हा देशाचा कणा आणि बळीराजा असून, त्याला समृद्ध व संपन्न करण्यासाठी स्वामी अत्यंत श्रद्धावान आणि आश्वासक मार्गदर्शन करताना या चित्रपटात दिसून आले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विविध कृषी विषयासंदर्भात पुस्तके वाचूनही रासायनिक खते यांच्याबाबतीत बरीचशी माहिती देण्यात आलेली आहे चुकीच्या पद्धतीने या खतांचा वापर केल्यास पूर्णपणे नुकसान ही शेतकऱ्याचेच होते आणि यातूनच शेतकरी खूप मोठ्या संकटात सापडतो. या संकटाला तोंड देण्याऐवजी काही शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात परंतु या संकटातून मात करून पुढे जाण्याचा मार्ग स्वामिनी प्रेक्षकांना दाखवून दिलेला आहे. चित्रपटात सामाविष्ट सर्वच कलाकारांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अतिशय निर्भिड आणि प्रासंगिक स्वरूप प्रेक्षकांपुढे मांडण्यात आलेले दिसून येते.

या विशेष दौऱ्यादरम्यान उपस्थित राहणाऱ्या प्रेक्षकांना केवळ कलाकारांना भेटण्याचीच संधी मिळणार नाही, तर त्यांच्यासोबत अविस्मरणीय फोटो आणि सेल्फी काढण्याचा आनंदही प्रेक्षकांनी घेतला 'देऊळ बंद' चित्रपटाच्या पहिल्या भागाला संपूर्ण महाराष्ट्रातून प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. त्यामुळे या दुसऱ्या भागाबद्दल आणि कलाकारांच्या या थेट दौऱ्याबद्दल सिनेप्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मराठी चित्रपटाचा हा आनंद द्विगुणित करण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर मराठी चित्रपट संस्कृतीला बळकट प्रोत्साहन देण्यासाठी या माध्यमातून आयोजन करण्यात आले आहे.

या खास भेटीचे आणि चित्रपटाचे औचित्य साधून प्रेक्षकांसाठी एक अत्यंत मोठी आणि दिलासादायक घोषणा करण्यात आली आहे. संपूर्ण दिवसाच्या सर्व शोचे तिकीट अवघ्या १०० रुपयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. सर्वसामान्य प्रेक्षकांना, शेतकऱ्यांना आणि संपूर्ण कुटुंबाला मराठी चित्रपटाचा हा भव्य उत्सव अगदी कमी खर्चात अनुभवता यावा, यासाठी ही विशेष सवलत देण्यात आली आहे. 'चला तर मग, कलाकारांना भेटूया आणि मराठी चित्रपटाचा उत्सव साजरा करूया' असे आवाहन करत आयोजकांनी जास्तीत जास्त चित्रपटप्रेमींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या लाडक्या कलाकारांचे स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येने प्रेक्षक वर्ग उपस्थित होता.

# श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत बालमजुरीविरोधी जनजागृती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माळवाडी (बोटा) येथे जागतिक बालमजुरीविरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन इव्हेंट मॅनेजमेंट कमिटीने प्रा. निशा वरे यांच्या मार्गदर्शनाखाली केले. आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालमजुरीमुक्त समाज निर्माण करण्याचा प्रभावी संदेश दिला.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर व सचिव डॉ. अमित पोखरकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी पायल खेमनार, स्वामिनी शेळके व विद्यार्थी प्रशांत गीते यांनी केले. यावेळी विद्यार्थीनी निकिता भोसले, साक्षी वाळे तसेच विद्यार्थी सुमेध भोईर यांनी बालमजुरीचे दुष्परिणाम, शिक्षणाचे महत्त्व आणि बालहक्क याविषयी प्रभावी भाषणे सादर केली. तसेच विद्यार्थीनी सना शेख व विद्यार्थी अयाज शेख, ओम गुंड, बाळेश्वर काशीद आणि वर्गातील इतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाटिकेने व पोस्टर सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमांमधून प्रत्येक मुलाच्या हातात पुस्तक असावे, कामाचे ओझे नव्हे हा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला

मार्गदर्शन करताना डॉ. अमित पोखरकर यांनी बालमजुरी ही केवळ सामाजिक समस्या नसून मुलांच्या सर्वांगीण विकासाला अडथळा ठरणारी गंभीर बाब असल्याचे सांगितले. तर डॉ. शिवाजीराव पोखरकर यांनी शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क असून बालमजुरीच्या निर्मूलनासाठी समाजाने सजग व संवेदनशील राहण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमास फार्मसी विभागाच्या डॉ. अक्षदा सूर्यवंशी, प्रा. मंगल शेळके, प्रा. आकाश शेळके, प्रा. स्वप्नील वरे, प्रा. स्नेहा फंड, प्रा. सचिन वाकचौरे, प्रा. समीक्षा बिबवे, प्रा. ज्योती दातीर, प्रा. ज्योत्स्ना शेलार, प्रा. राधिका जाधव तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.बालमजुरी बालपण हिरावते, शिक्षण भविष्य घडवते हा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी अॅड. शिवाजी कराळे, उपाध्यक्षपदी अॅड. अनिता दिघे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - सुमारे २०० वर्षांची वैभवशाली परंपरा लाभलेल्या शहरातील जुन्या न्यायालयात असलेल्या कौटुंबिक न्यायालयातील वकिलांच्या फॅमिली कोर्ट अॅडव्होकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी अॅड. शिवाजी अण्णा कराळे यांची तर उपाध्यक्षपदी अॅड. अनिता दिघे, कार्याध्यक्षपदी अॅड. लक्ष्मण कचरे, सचिवपदी अॅड. शिवाजी सांगळे, खजिनदारपदी अॅड.बाबाजी सांगळे व महिला सचिवपदी अॅड. पल्लवी दातीर यांच्यासह कार्यकारणी सदस्यांची बिनविरोध निवड झाली. असोसिएशनचे मावळते अध्यक्ष अॅड. लक्ष्मण कचरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या असोसिएशनच्या बैठकीत सर्वानुमते नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. २०२६ ते २८ या दोन वर्षांसाठी या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

या बैठकीमध्ये असोसिएशनच्या कार्यकारिणी सदस्यपदी जेष्ठ विधिज्ञ ड.सुरेश लगड, अॅड.मच्छिंद्र आंबेकर, अॅड.कल्याण पागर, अॅड. पोपट म्हस्के, अॅड. मनीषा केळगंद्रे-शिंदे, अॅड. राजेश कावरे व अॅड. कु.किरण जाधव आदींच्याही सर्वानुमते नियुक्त्या करण्यात आल्या. या बैठकीत अध्यक्ष पदासाठी शिवाजी कराळे यांच्या नावाची सूचना सुरेश लगड यांनी मांडली त्यास राजेश कावरे यांनी अनुमोदन दिले.

फॅमिली कोर्ट बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष अॅड. शिवाजी अण्णा कराळे हे गेल्या ३१ वर्षांपासून वकील क्षेत्रात कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी २०१३ ते १४ या काळात अहमदनगर बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. तसेच २०२२ साली ते कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्षही होते. आता दुसऱ्यांदा या पदाची जबाबदारी अॅड. कराळे यांना मिळाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अॅड. कल्याण पागर यांनी कामकाज पाहिले. यावेळी अॅड. शिवाजी कराळे म्हणाले, जुन्या न्यायालयाला २०० वर्ष पूर्ण झाले आहेत. अशा मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या न्यायालयातील फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळणे हे माझे मोठे भाग्य आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा माझ्यावर टाकून सर्व सदस्यांनी मोठा विश्वास व्यक्त केला आहे. या पदाच्या माध्यमातून वकिलांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याबरोबरच बार व बेंच मध्ये सकारात्मक वातावरण ठेवण्यास प्राधान्य देऊ. तसेच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण असे विविध क्षेत्रातील उपक्रम राबवण्यावर भर देणार आहे. सर्व वकील बंधुभगिनींना बरोबर कामकाज करणार आहे.

## महागाईचा भडका

# सर्वसामान्यांचे बजेट कोलमडतेय का ?




महागाई हा कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेसमोरील एक गंभीर प्रश्न असतो. वस्तू आणि सेवांच्या किमती सातत्याने वाढत राहिल्या की त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानावर होतो. गेल्या काही वर्षांत अन्नधान्य, इंधन, वीज, शिक्षण, आरोग्य सेवा आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमतींमध्ये झालेली वाढ पाहता महागाईचा फटका प्रत्येक कुटुंबाला बसत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडतेय का? हा प्रश्न आज अधिक तीव्रतेने विचारला जात आहे.

सामान्य कुटुंबाचे मासिक उत्पन्न मर्यादित असते. त्या उत्पन्नातून घरभाडे, वीजबिल, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च, वाहतूक आणि दैनंदिन गरजांची पूर्तता करावी लागते. मात्र महागाई वाढल्याने या सर्व खर्चांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः खाद्यतेल, डाळी, भाजीपाला, दूध आणि धान्य यांच्या दरवाढीमुळे गृहिणींचे घरगुती अर्थकारण विस्कळीत झाले आहे. पूर्वी ज्या रकमेतील महिनाभराचा किराणा भरत असे, त्याच रकमेत आज पंधरा ते वीस दिवसही भागत नाहीत.

महागाईचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना बसतो. श्रीमंत वर्गाकडे वाढलेल्या खर्चाला तोंड देण्याची क्षमता असते, परंतु रोजंदारीवर काम करणारे मजूर, लहान व्यापारी, शेतकरी आणि नोकरदार वर्ग यांना प्रत्येक रुपयाचा हिशोब ठेवावा लागतो. उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसताना खर्च मात्र सातत्याने वाढत असल्याने बचतीचे प्रमाण घटत आहे. अनेक कुटुंबांना कर्ज घेऊन खर्च भागवावा लागत आहे.

इंधन दरवाढ हे महागाई वाढण्यामागील एक प्रमुख कारण मानले जाते. पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढले की वाहतूक खर्च वाढतो. त्याचा परिणाम सर्वच वस्तूंच्या किमतींवर होतो. बाजारात येणाऱ्या प्रत्येक वस्तूच्या किंमतीत वाहतुकीचा खर्च समाविष्ट असल्याने इंधन दरवाढीचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर दिसून येतो. त्याचप्रमाणे वीज, गॅस आणि इतर ऊर्जा स्रोतांच्या वाढत्या किंमतीही सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावत आहेत.

शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील वाढता खर्च हीदेखील चिंतेची बाब आहे. दर्जेदार शिक्षणासाठी वाढत्या फी, खासगी शिकवण्या आणि शैक्षणिक साहित्याचा खर्च वाढत आहे. दुसरीकडे आरोग्य सेवांवरील खर्चही झपाट्याने वाढत आहे. एखाद्या गंभीर आजारामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटण्याची उदाहरणे आजही दिसतात.

महागाईमुळे केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक परिणामही होतात. वाढत्या खर्चामुळे कुटुंबांमध्ये तणाव वाढतो. अनेकांना आपल्या गरजा कमी कराव्या लागतात. मुलांच्या शिक्षणावर, आरोग्यावर किंवा इतर आवश्यक बाबींवर तडजोड करावी लागते. त्यामुळे जीवनमानावर परिणाम होतो.

महागाई नियंत्रणासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवणे, साठेबाजीवर नियंत्रण आणणे, इंधन दर स्थिर ठेवण्यासाठी प्रयत्न करणे आणि रोजगाराच्या संधी वाढविणे यावर भर दिला पाहिजे. त्याचबरोबर शेती आणि उद्योग क्षेत्राला चालना दिल्यास उत्पादन वाढून किंमती नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकते. एकूणच, महागाई ही आज सर्वसामान्य नागरिकांसमोरील मोठी आर्थिक समस्या बनली आहे. वाढत्या किंमती आणि मर्यादित उत्पन्न यामुळे अनेक कुटुंबांचे मासिक बजेट डळमळीत झाले आहे. त्यामुळे महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासन, उद्योग क्षेत्र आणि नागरिक यांनीही जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. आर्थिक विकासाचा लाभ समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला, तरच सर्वसामान्यांचे जीवन अधिक सुसह्य आणि सुरक्षित होईल. महागाईचा भडका आटोक्यात ठेवणे ही केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक गरजही आहे.

# जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन क्षेत्रभेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर येथील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली शैक्षणिक क्षेत्रभेट नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी, महाविद्यालयीन वातावरण आणि विविध शैक्षणिक सुविधा यांची प्रत्यक्ष माहिती मिळावी या उद्देशाने ही भेट आयोजित करण्यात आली होती.

या क्षेत्रभेटीत एकूण ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर येथे भेट देऊन विविध विभाग, प्रयोगशाळा आणि शैक्षणिक सुविधा प्रत्यक्ष पाहिल्या. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांसोबत सहशिक्षिका रोजमीन शेख, स्नेहा पिंडिपॉल आणि प्रशांत त्रिभुवन यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. विविध अभ्यासक्रम, करिअरच्या संधी आणि उच्च शिक्षणाचे महत्त्व याविषयी माहिती देण्यात आली. तसेच प्रयोगशाळांमधील उपकरणे, वाचनालय, वर्गखोल्या आणि आधुनिक शिक्षण सुविधा यांचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

विद्यार्थ्यांनी या भेटीत मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यांनी अनेक प्रश्न विचारून अभ्यासक्रम आणि करिअरविषयक माहिती जाणून घेतली. या अनुभवातून विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाबद्दल जागरूकता निर्माण झाली तसेच शैक्षणिक नियोजन आणि करिअर उद्दिष्टांचे महत्त्व समजले.

या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांच्या निरीक्षणशक्ती, संवादकौशल्य आणि जिज्ञासू वृत्तीला चालना मिळाली. विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यावसायिक शिक्षण क्षेत्रांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला. शाळेच्या वतीने अशा शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागत असल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी ही क्षेत्रभेट प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरली.

# संपादकीय...

### जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन

## ज्येष्ठांच्या सन्मानासाठी समाजाची जबाबदारी

दरवर्षी १५ जून हा दिवस जगभरात जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन म्हणून पाळला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने २००६ पासून या दिवसाला मान्यता दिली असून वृद्ध व्यक्तींवरील अत्याचार, दुर्लक्ष आणि शोषण याविषयी जनजागृती निर्माण करणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्याला महत्त्व असते, परंतु आयुष्याच्या उत्तरार्धात व्यक्तीला सर्वाधिक गरज असते ती सन्मान, प्रेम, सुरक्षितता आणि आधाराची. दुर्दैवाने आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात अनेक ज्येष्ठ नागरिकांना उपेक्षा, एकाकीपणा आणि अत्याचारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वृद्धांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे आणि त्यांच्याविषयी संवेदनशीलता वाढवणे ही काळाची गरज बनली आहे. भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा सन्मान ही एक परंपरा मानली जाते. आपल्या संस्कृतीत माता-पिता, आजी-आजोबा आणि कुटुंबातील वडीलधाऱ्यांना विशेष स्थान दिले गेले आहे. त्यांच्या अनुभवांचा आदर करणे, त्यांचे मार्गदर्शन घेणे आणि त्यांची सेवा करणे हे कर्तव्य मानले गेले आहे. मात्र बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे या मूल्यांमध्ये हळूहळू बदल होताना दिसत आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण, वाढती आर्थिक स्पर्धा, एकत्र कुटुंब पद्धतीचे विघटन आणि बदलती जीवनशैली यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक कुटुंबात असूनही एकाकी जीवन जगत आहेत. वृद्ध अत्याचार म्हणजे केवळ शारीरिक मारहाण नव्हे. मानसिक छळ, अपमानास्पद वागणूक, आर्थिक शोषण, भावनिक दुर्लक्ष, सामाजिक बहिष्कार आणि आवश्यक काळजी न घेणे यांचाही त्यात समावेश होतो. अनेकदा वृद्धांच्या भावना, मत आणि गरजांकडे दुर्लक्ष केले जाते. काही ठिकाणी त्यांच्या मालमत्तेवर किंवा आर्थिक साधनांवर नियंत्रण मिळविण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला जातो. वृद्धांच्या बँक खात्यांचा गैरवापर, संपत्ती बळकावण्याचे प्रयत्न किंवा त्यांना फसवून आर्थिक लाभ घेण्याच्या घटना वाढताना दिसतात. याशिवाय घरातच त्यांच्याशी अपमानास्पद भाषेत बोलणे, त्यांना निर्णय प्रक्रियेतून दूर ठेवणे किंवा त्यांना ओझे समजणे हे देखील मानसिक अत्याचाराचे प्रकार आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेच्या विविध अहवालांनुसार जगभरातील लाखो वृद्ध व्यक्तींना काही ना काही स्वरूपाच्या अत्याचारांचा सामना करावा लागतो. मात्र अनेक घटना समाजासमोर येत नाहीत. वृद्ध व्यक्ती कुटुंबीयांवर अवलंबून असल्यामुळे किंवा नातेसंबंध बिघडण्याच्या भीतीने तक्रार करण्याचे टाळतात. काहींना आपल्या हक्कांविषयी माहिती नसते, तर काहींना मदत कुठे मिळेल याची जाणीव नसते. त्यामुळे प्रत्यक्षात अत्याचाराच्या घटनांची संख्या अधिक असण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करतात. कोविड-१९ महामारीच्या काळात वृद्धांच्या समस्या अधिक प्रकर्षाने समोर आल्या. अनेक ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक धोक्यांसोबतच सामाजिक एकाकीपणा आणि मानसिक तणावाचा सामना करावा लागला. कुटुंबीयांपासून दूर राहणाऱ्या किंवा एकटे राहणाऱ्या वृद्धांसाठी ही परिस्थिती अधिक कठीण ठरली. या अनुभवाने समाजाला हे दाखवून दिले की वृद्धांच्या शारीरिक आरोग्याइतकेच त्यांचे मानसिक आणि सामाजिक आरोग्यही महत्त्वाचे आहे. भारतात ज्येष्ठ नागरिकांच्या संरक्षणासाठी विविध कायदे आणि योजना अस्तित्वात आहेत. पालक व ज्येष्ठ नागरिक भरणपोषण आणि कल्याण अधिनियम, २००७ हा कायदा वृद्ध पालकांच्या भरणपोषणाची जबाबदारी मुलांवर आणि वारसांवर निश्चित करतो. याशिवाय केंद्र आणि राज्य सरकारांकडून वृद्धांसाठी विविध कल्याणकारी योजना, आरोग्य सेवा, निवृत्तीवेतन योजना आणि सवलती उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र केवळ कायदे आणि योजना पुरेशा नाहीत. समाजातील प्रत्येक घटकाने वृद्धांविषयी आदर आणि संवेदनशीलता बाळगणे आवश्यक आहे. कुटुंब ही वृद्धांच्या सुरक्षिततेची सर्वात महत्त्वाची जागा असते. ज्येष्ठ व्यक्तींना वेळ देणे, त्यांच्या भावना समजून घेणे, त्यांच्या अनुभवांचा आदर करणे आणि त्यांना कुटुंबातील निर्णयांमध्ये सहभागी करणे या साध्या गोष्टी त्यांच्या आयुष्यात मोठा सकारात्मक बदल घडवू शकतात. वृद्धांना केवळ आर्थिक आधार नव्हे, तर भावनिक आधाराचीही गरज असते. त्यांच्या एकटेपणाची जाणीव ठेवून त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना समाजाशी जोडून ठेवणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे.

समाजातील विविध संस्था, स्वयंसेवी संघटना, शैक्षणिक संस्था आणि माध्यमे यांनीही वृद्धांच्या प्रश्नांबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. वृद्धांच्या हक्कांविषयी माहिती देणे, अत्याचाराच्या घटनांबाबत तक्रार नोंदविण्याचे मार्ग उपलब्ध करून देणे आणि समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्येही ज्येष्ठांचा सन्मान आणि कौटुंबिक मूल्ये याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात 'खेती बचाव' अभियान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या खेती बचाव अभियान कार्यक्रमांतर्गत माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात जमीन सुपीकता शाश्वत शेती याचबरोबर शेतकऱ्यांमध्ये जनजागृती बाबत विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. एस. बी. खरबडे, डॉक्टर अण्णासाहेब शिंदे कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन नलावडे, कृषी कीटकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कदम, प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ, डॉ. रवी आंधळे, श्री. सोनार , प्रबंधक प्रा. जी.बी. बाचकर प्रमोद देशमुख, सागर वाकचौरे आदी उपस्थित होते.

गुंजाळवाडी येथे सुरू असलेल्या विश्व गौरव विभूषित परमपूज्य स्वामी गंगागिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहात या महाविद्यालयाने विविध शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञानाच्या बाबत माहिती दिली आहे. यावेळी राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख, दिलीपराव शिंदे, यांच्यासह विविध मान्यवरांनी भेट दिली. याप्रसंगी डॉ. एस बी खरबडे यांनी, सरकारच्या खेती बचाव अभियानाचे मुख्य उद्दिष्टे व माहिती शेतकऱ्यांना दिली. जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी मृदा परीक्षण, सेंद्रिय खतांचा वापर ,संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी यावेळेस केले.

तर प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ यांनी बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती पद्धतीचा स्वीकार करून उत्पादन वाढीचा पर्यावरण संवर्धन साध्य करण्यासाठी शेतकऱ्यांना विविध उपाय योजना सांगितल्या. यावेळी दररोज येणाऱ्या हजारो शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात येत असून या अभियानामुळे पीक संरक्षण, मृदा संवर्धन आणि शाश्वत शेती उपयुक्त माहिती मिळाल्याची भावना सर्व शेतकरी व भाविकांनी व्यक्त केली.

# शेतात जाण्यास मज्जाव
## चार जणांवर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा शिवारातील स्वत:च्या मालकीच्या शेतात जाण्यासाठी मज्जाव केला. तसेच फिर्यादीला शिवीगाळ व दमदाटी करत अतिक्रमण केल्याच्या आरोपावरुन चार जणांविरुध्द संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याप्रकरणी मनिष कांतीलाल गांधी ( वय ५२) धंदा व्यापार व शेती, रा. नेहरु चौक, संगमनेर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ५ जून २०२६ रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास ते हिवरगाव पावसा शिवारातील त्यांच्या शेतात गेले असता, हिवरगाव पावसा येथील महेश विश्वनाथ पावसे व इतर तीन अनोळखी व्यक्ती (नाव व गाव माहीत नाही) यांनी त्यांना शिवीगाळ करीत, त्यांना शेतात जाण्यास मज्जाव केला. तसेच अतिक्रमण करीत बळजबरीने शेतात नांगरट केली आहे. या प्रकरणाचा तपास सहायक फौजदार बी. वाय टोपले करीत आहेत.

# 31 ऑगस्टपर्यंत पिण्याच्या...

पान १ वरून - विभागात पिण्याच्या पाण्याच्या गरजांना प्राधान्य देवून उपलब्ध जलसाठ्याचे काटेकारपणे नियोजन करण्याबातही गांभिर्याने कार्यवाही करण्यास आधिका-यांना सांगण्यात आले आहे. नाशिक, अहिल्यानगर, पुणे, मराठवाडा विभागातील जलशयांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची नवीन आवक सुरु होईपर्यंत असलेल्या पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा. अगामी मान्सुनच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करतानाच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ग्रामीण व शहरी भागातील टंचाई निवारण आणि जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यावर भर देण्याबातही बैठकीत ठरविण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यासह गोदावरी खो-यातील विविध प्रकल्पांची स्थिती लक्षात घेता स्थानिक प्रशासन, जलसंपदा विभाग व पाणीपुरवठा यंत्रणांनी समन्वयाने काम करुन पाण्याचे नियोजन करावे, उपलब्ध जलसाठ्याचा वापर अत्यावश्यक गरजांसाठी करण्याबाबत जनजागृती करण्याचे आवाहनही मंत्री विखे पाटील यांनी या बैठकीत आधिका-यांना केले आहे. उपलब्ध पाण्याचा वापर सर्वप्रथम पिण्यासाठी करण्यात यावा, बेकायदेशिर पाणी उपसा रोखण्यासाठी विशेष माहीम राबवण्यासाठी महसूल, पोलिस आणि जलसंपदा विभाग यांच्या संयुक्त पथकांमार्फत कठोर करावाई करण्याबाबतही स्पष्ट आदेश मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिले आहेत.

# डॉ. मिलिंद भोर यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - संगमनेर येथील नामांकित धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेले डॉ. मिलिंद मच्छिंद्र भोर (वय ४८, रा. अंबड, ता. अकोले) यांचे शनिवारी रात्री अकरा वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि चुलते असा मोठा परिवार आहे. ते वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार हभप मनोहर महाराज भोर तसेच शिर्डी संस्थानचे विश्वस्त डॉ. जालिंदर भोर यांचे पुतणे होत. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# केक, मिठाई, पार्सल पॅकिंगमध्ये धातूच्या पिन वापरास मनाई

मुंबई (वृत्तसंस्था) ग्राहकांच्या आरोग्य आणि सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (ऋडड-ख) महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. देशभरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, बेकरी, मिठाई दुकाने तसेच सर्व खाद्य व्यवसायिकांना खाद्यपदार्थांच्या पॅकिंगसाठी स्टेपल पिन, मेटल वायर किंवा अशाच प्रकारच्या धातूच्या वस्तूंचा वापर करण्यास तात्काळ बंदी घालण्यात आली आहे.

FSSAI च्या नव्या निर्देशानुसार, केक, मिठाईचे बॉक्स, स्नॅक्स पॅकेट्स, टेक-अवे फूड पार्सल्स आणि इतर खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंगमध्ये स्टेपल पिन किंवा मेटल वायर वापरण्याची प्रथा अनेक ठिकाणी आढळून आली आहे. काही प्रकरणांमध्ये या धातूच्या वस्तू थेट अन्नामध्ये किंवा पॅकिंगमध्ये सापडल्याने ग्राहकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे.प्राधिकरणाने स्पष्ट केले की, स्टेपल पिन किंवा मेटल वायर चुकून अन्नासोबत गिळल्या गेल्यास तोंड, घसा आणि पचनसंस्थेला इजा होऊ शकते.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME IS HABIBUNNISA SALAHUDDIN INAMDAR

TO NEW NAME AS HABIBUNNISA SALAUDDIN INAMDAR

UIDAI 267568182685
ADRESS - KURAN ROAD SANGAMNER- 422605

**पाहिजेत**
माऊली ग्रीन सोल्युशन येथे कामासाठी मुले पाहिजेत
सोलर, सीसीटिव्ही, संगणक सिस्टीममध्ये तांत्रिकज्ञान आवश्यक
7588095215
7888095215

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क - 9822258458

**पाहिजेत**
मौजे सावरगाव घुले ता. संगमनेर येथे शेतात विहिर खोदण्यासाठी लाँग बुमचे फोकलॅन मशिन पाहिजे
(सोबत बंद लिफाफ्यात दरपत्रक देणे, योग्य दरपत्रकास काम देण्यात येईल)
- संपर्क -
श्री. राघू सावळेराम जाधव मु. पो. वरूडी पठार, ता. संगमनेर,जि. अ.नगर
मो. ९३७३९६७३६७

**SLH ADVISORS PVT LTD**
TAX | ACCOUNTING | CONSULTING
WE ARE HIRING JOIN OUR TEAM
Marketing Executive 05
B.Com./M.Com./MBA, Salary - Rs. 25,000/-
TeleCaller (Female) 02
Graduate Preferred, Salary - Rs. 15,000/-
Digital Marketing Executive 02
Graduate, MBA, Salary - Rs. 20,000/-
SEO, Google Ads, Content Creation Experience
Contact : 7666387377
SLH Advisors Pvt. Ltd., Saish Business Park, Near Kavi Anant Fandi Natyagruha, Sangamner

**पाहिजेत**
दुकान कामासाठी पुर्ण वेळ माणसे पाहिजेत
मुले - ४ अनुभवास प्राधान्य
आकर्षक पगार दिला जाईल
- संपर्क - 9881155177

**घर विक्रीसाठी आहे**
अकोले-नाशिक बायपास रोड डेरे इंग्लीश शाळेजवळ संगमनेर येथे १५०० चौ फूट उत्तरमुखी २० फुटी रोड टच सर्व सोईनेयुक्त टायटल क्लिअर घर विकणे आहे
आशा पवार
8999362929

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846


**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

**हॉटेल अन्नपूर्णासाठी**
मेस व नाष्ट्यासाठी कुक (आचारी) पाहिजे
आकर्षक पगार मिळेल
राजश्री कृषी केंद्रा शेजारी देवगाव रोड, संगमनेर खुर्द
9011326117
7588004655

**पाहिजेत**
इथापे इन्स्टिटयूट करीता खालील पदे भरणे आहेत
अकाऊंटट –३ क्लार्क –३
ड्रायव्हर–३ वॉचमन– ३
तरी संबंधीतांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह समक्ष भेटावे

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ऑसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६



# राजहंसचे ‘मिशन 50 लिटर’ सुरू

## पंजाब अभ्यास दौऱ्यासाठी 50 शेतकरी रवाना



संगमनेर ( प्रतिनिधी) कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा मा.कृषी व महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह देशमुख यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात येत असलेल्या मिशन ५० लिटर योजनेअंतर्गत तालुक्यातील ५० युवा दूध उत्पादक शेतकरी सात दिवसांच्या पंजाब अभ्यास दौऱ्यासाठी रवाना झाले आहे.

संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघ येथून या ५० शेतकऱ्यांच्या प्रवास गाडीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात, चेअरमन रणजीतसिंह देशमुख, आमदार सत्यजित तांबे, व्हा.चेअरमन राजेंद्र चकोर, लक्ष्मणराव कुटे, संपतराव डोंगरे, आर.बी.राहणे, संचालक विलासराव वर्पे,संतोष मांडेकर,विलास कवडे, बबन कुऱ्हाडे, बादशहा वाळुंज, संजय पोकळे, विक्रम थोरात,विष्णू ढोले,रवींद्र रोहम,सौ.प्रतिभा सोमनाथ जोंधळे,सौ.मंदा गोरख नवले, डॉ.प्रमोद पावसे, कार्यकारी संचालक डॉ.सुजित खिलारी यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

या सात दिवसांच्या अभ्यास दौऱ्यात चेअरमन रणजीतसिंह देशमुख, व्हाईस चेअरमन राजेंद्र चकोर, संचालक विलास कवडे, डॉ.प्रमोद पावसे,संतोष मांडेकर,तालुक्यातील ३५ युवा उद्योजक दूध उत्पादक शेतकरी व १५ पशुवैद्यकीय अधिकारी याचबरोबर दूध संघाच्या वतीने पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.विजय कवडे,ड सुरेश जोंधळे यांचा समावेश आहे.

हे शिष्टमंडळ दिल्ली येथून पंजाब मधील फिरोजपुर येथे दाखल होणार आहे तेथील मोठे गाय गोठे असलेल्या शेतकऱ्यांच्या फार्मला भेट देणार आहेत. याचबरोबर वैद्यकीय अधिकारी व्हेटर्नरी सेमिनार साठी उपस्थित राहणार असून फार्म मॅनेजमेंट साठी तीन दिवसांचे ट्रेनिंग ठेवण्यात आले आहे.

देशात सर्वाधिक दूध उत्पादन हे पंजाबमध्ये होत असून तेथील शेतकऱ्यांनी कमी गाईंमध्ये जास्त दूध उत्पादन घेतले आहे. या संकल्पनेतून संघाच्या वतीने मिशन ५० लिटर राबविण्यात येत आहे. ५० लिटर गाय निर्माण करण्यासाठी संघाच्या वतीने विशेष प्रणाली राबवण्यात आली असून पुढील सात वर्षांमध्ये विविध गोठ्यांमध्ये या गाई असतील असा विश्वास रणजीतसिंह देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी शुभेच्छा देताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, शुद्धता आणि गुणवत्ता जपल्यामुळे राजहंस दूध संघाचे नाव राज्यात मोठे आहे. दूध हे शाश्वत उत्पादन देणारे आहे. गोरगरिबांच्या जीवनामध्ये या व्यवसायामुळे समृद्धी आली आहे. राजहंसचा मुरघास व मुक्त संचार गोठा प्रकल्प राज्यासाठी अनुकरणीय ठरला आहे. आगामी काळात कमी गाईंमध्ये जास्त उत्पादन घेण्यासाठी दूध संघाच्या वतीने मिशन ५० लिटर हा उपक्रम राबविण्यात आला आहे. यामधून ५० लिटर दूध उत्पादन देणाऱ्या गाई निर्माण होतील. या अभ्यास दौऱ्यामुळे पंजाब मध्ये या व्यवसायामध्ये झालेली क्रांती शेतकऱ्यांना पहावयास मिळणार आहे. तेथील नवीन पद्धतींचा अवलंब हे शेतकरी संगमनेर तालुक्यात करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी संघाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील युवा उद्योजक शेतकऱ्यांचा हा अभ्यास दौरा संगमनेर तालुक्यातील दूध उत्पादन वाढीसाठी नक्कीच फायदेशीर होणार असल्याचे कार्यकारी संचालक डॉ.सुजित खिलारी यांनी म्हटले आहे.

# तालुक्यात ५५ हजारांचा बेकायदा गुटखा जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्ह्यातील घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रणखांब येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून मानवी आरोग्यास अपायकारक असलेला प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला. या कारवाईत ५५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखू विक्रेत्यांवर कडक कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी हरीष भोये यांच्या मार्गदर्शनाखालील पथक घारगाव हद्दीत गस्त घालत होते. यावेळी रणखांब येथील एका घरात विक्रीच्या उद्देशाने गुटख्याचा साठा करून ठेवल्याची माहिती पथकाला

मिळाली.

पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे, अंमलदार राहुल डोके, बाळासाहेब गुंजाळ आणि योगेश कर्डीले यांच्या पथकाने पंचांसमक्ष संबंधित घरावर छापा टाकला. यावेळी प्रभाकर आण्णासाहेब गुळवे (वय ३८, रा. रणखांब, ता. संगमनेर) हा मिळून आला. घराची झडती घेतली असता तेथे हिरा पानमसाला आणि रॉयल ७१७ सुगंधित तंबाखूचा साठा तसेच मोबाईल असा एकूण ५५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल सापडला. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या प्रभाकर गुळवे याच्याकडे सखोल चौकशी केली. हा गुटखा राजू नामदेव ढेरंगे (रा. खंडेरायवाडी, ता. संगमनेर) याच्या सांगण्यावरून घरात ठेवल्याचे आणि संगमनेर येथील आफ्रिदी पठाण याच्याकडून आणल्याची कबुली त्याने दिली.

याप्रकरणी पोलीस अंमलदार बाळासाहेब गुंजाळ यांच्या फिर्यादीवरून घारगाव पोलीस ठाण्यात वरील तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) सह अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ चे कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा

पुढील तपास घारगाव पोलीस करत आहेत. मानवी आरोग्यास घातक असणाऱ्या अवैध पदार्थांची विक्री व साठा करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा स्थानिक गुन्हे शाखेने दिला आहे.

# महिलांच्या सक्षमीकरणाला स्टॅंडर्ड चार्टर्डची चालना

## विकासाच्या प्रवाहात ३० जिल्ह्यांचा सहभाग

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -स्टॅंडर्ड चार्टर्ड बॅंकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टॅंडर्ड चार्टर्ड बॅंकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बॅंकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

जलसुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना -

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच ८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने ७ लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना -

रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६ हजार ५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बॅंकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे.

आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी-

आरोग्य क्षेत्रात बॅंकेच्या ‘सीईंग इज बिलिव्हिंग’ या प्रमुख उपक्रमांतर्गत ४ लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे. स्टॅंडर्ड चार्टर्ड बॅंक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बॅंक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

# जाभुंळवाडी येथे घरफोडी करून दागिने व रोख रक्कम लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : राहते घर बंद करून शेजारी झोपण्यासाठी गेलेल्या महिलेच्या घराचा कडी-कोयंडा तोडून घरातील पेटीत ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा सुमारे ७१ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना संगमनेर तालुक्यातील घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जांभुळवाडी येथे १२ जूनच्या रात्री ९ ते १३ जून रोजीच्या पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

या प्रकरणी कौसाबाई शहाजी खेमनर (वय ७०), व्यवसाय शेती, रा. जांभुळवाडी, ता. संगमनेर या ज्येष्ठ नागरिक महिलेने घारगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, १२ जून रोजी त्या त्यांच्या राहत्या घराला कुलूप लावून शेजारी असलेल्या जिजाबाई लहानू खेमनर यांच्या घरी झोपण्यासाठी गेल्या होत्या. घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने दाराचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला व आतील लोखंडी पेटीत ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ७१ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. सकाळी घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. या घरफोडीबाबत घारगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गांधले करीत आहेत.

# पतीच्या छळ असाह्य; पत्नीची आत्महत्या

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -अवघ्या तीन वर्षापूर्वी विवाह करुन सासरी नांदण्यास गेलेल्या विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेत, तिच्या पतीने शिवीगाळ, दमदाटी व मारहाण केल्यामुळे वैतागलेल्या विवाहीत युवतीने आत्महत्या केली. गावाच्या परिसरातील खाणीच्या पाण्यात उडी मारुन सदर विवाहीतेने जीवनयात्रा संपवल्याची दुर्दैवी घटना संगमनेर तालुक्यातील मेंढवण शिवारात घडली. माधुरी ज्ञानदेव कांदळकर (वय २१) असे तिचे नाव असून, ही घटना शनिवारी १३ जून रोजी सकाळी सहा वाजण्यापूर्वी घडली.

याबाबत तिचे वडील रावसाहेब देवराम घोडे (वय ७२), धंदा शेती, रा. वाखारी वस्ती, शिवापूर, कोकणगाव, ता. संगमनेर यांनी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांची कन्या माधुरी हिचा विवाह तालुक्यातील कौठे कमळेश्वर येथील ज्ञानदेव सोपान कांदळकर यांच्याबरोबर २३ मार्च २०२३ रोजी झाला होता. विवाहानंतर सासरी नांदत असताना, तिचा पती ज्ञानेश्वर हा तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला सातत्याने शिवीगाळ, दमदाटी व मारहाण करुन शारिरीक व मानसिक त्रास देत असे. हा त्रास असह्य झाल्याने अखेर तिने खाणीच्या पाण्यात उडी घेवून आत्महत्या केली. या फिर्यादीवरून संगमनेर तालुका पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ११५(२), ३५२, ३५१(१) प्रमाणे विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला असून, तातडीने हालचाली करुन, आरोपी ज्ञानेश्वर कांदळकर यास शनिवारी रात्रीच अटक केली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रविण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विकास काळे करीत आहेत.







मा. श्री. गजेंद्र अभंग
नगरसेवक, संगमनेर
नगरपरिषद, संगमनेर



सोमनाथ कानकाटे
मा. व्हा. चेअरमन
शारदा नागरी सह. पतसंस्था संगमनेर



डॉ. सतिश वर्पे
संचालक - ओम गगणगिरी हॉस्पिटल



सौ. स्वाती विखे
सर्जनशील आर्किटेक्ट

शुभेच्छुक -
दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता


# राजापूर रोडवरील गटारीवरील स्लॅब कामाला वेग

## के. के. जी. कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून काम प्रगती पथावर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- : संगमनेर शहरातील राजापूर रोड परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने गटारीवरील आरसीसी स्लॅब टाकण्याच्या कामाला वेग आला असून हे काम के. के. जी. कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराने प्रत्यक्ष काम सुरू केले आहे.





संगमनेर येथील राजापूर रोड परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांतर्गत के.के.जी. कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत गटारीवरील आरसीसी स्लॅब टाकण्याचे काम सुरू असल्याचे दृश्य.

राजापूर रोड, कसारवाडी-ढोलेवाडी परिसरातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या गटारीवर मजबूत आरसीसी स्लॅब बसविण्याचे काम सुरू आहे. यासाठी लोखंडी जाळी बसवून कॉंक्रीट टाकण्याची प्रक्रिया सुरू असून रेडीमिक्स कॉंक्रीटचा वापर करण्यात येत आहे. कामामुळे गटारीचे संरक्षण होण्याबरोबरच नागरिकांना व वाहनधारकांना अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर मार्ग उपलब्ध होणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली के.के.जी. कन्स्ट्रक्शन कंपनीकडून हे काम तांत्रिक निकषांनुसार करण्यात येत असून गुणवत्तेवर विशेष भर दिला जात आहे. अनेक वर्षांपासून उघड्या गटारीमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात अपघाताची शक्यता निर्माण होत असल्याने स्थानिकांकडून या कामाची मागणी करण्यात आली होती.

काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित होणार असून रस्त्याचे सौंदर्यही वाढणार आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी २ जुलैला संगमनेरमध्ये भीमसैनिकांचे आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे या मागणीसाठी संगमनेर तालुक्यातील बौद्ध समाजाची महत्वपूर्ण बैठक पार पडली.ज्येष्ठ नेते श्रीकांत भालेराव यांच्या अध्यक्षतेखालीज झालेल्या बैठकीत समाजाच्या विविध प्रश्नावर चर्चा करून आगामी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली उपस्थितांनी एकाजुटीने लोकशाही मार्गाने लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस, ज्येष्ठ नेते श्रीकांत भालेराव, माणिकराव यादव, आशिष शेळके, बाळासाहेब गायकवाड,कैलास कासार, ड. किरण रोहम, राजू खरात, प्रवीण गायकवाड,अनिल भोसले,किशोर चव्हाण, विनोद गायकवाड,बंटी यादव, के. जी.भालेराव, रवी गिरी,सचिन साळवे,गणेश बोऱ्हाडे संदीप दारोळे आदिसंह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील भीम सैनिकांच्या वतीने २ जुलै २०२६ रोजी संगमनेर शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून मोर्चाला सुरुवात होऊन नवीन नगर रोडवरील प्रांतकार्यालयात पोहचल्यावर प्रांत अधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे. तरीही तालुक्यातील सर्व भीमसैनिक व समाजबांधवांनी आपली एकजूट व ताकद दाखविण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# राजस्थान युवक मंडळाच्या कार्याध्यक्षपदी सागर मणियार

## मर्दा उपाध्यक्ष, आसावा सचिव तर कलंत्री खजिनदारपदी


मा. श्री. मनीषजी मालपाणी
अध्यक्ष


श्री. सागर मणियार
कार्याध्यक्ष


श्री. कल्पेश मर्दा
उपाध्यक्ष


श्री. कृष्णा आसावा
सचिव


श्री. वेणुगोपल कलंत्री
खजिनदार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ७६ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या राजस्थान युवक मंडळाच्या सर्वसाधारण सभेचे नुकतेच आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. सभेचे संचालन मावळते कार्याध्यक्ष सुमित अट्टल यांनी केले. यावेळी सुमित अट्टल यांनी मागील वर्षभरात मंडळामार्फत राबविण्यात आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक व जनकल्याणकारी उपक्रमांचा सविस्तर वार्षिक अहवाल तसेच विविध प्रकल्पांचा आर्थिक हिशोब सभेसमोर सादर केला. सदस्यांनी या कामकाजाचे कौतुक करत अहवालास मंजुरी दिली.

त्यानंतर पुढील वर्षासाठी नवीन कार्यकारिणीच्या निवड प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली. कार्याध्यक्षपदासाठी मागील वर्षाचे उपाध्यक्ष सागर मणियार, उपाध्यक्षपदासाठी कल्पेश मर्दा, सचिवपदासाठी कृष्णा आसावा, खजिनदारपदासाठी वेणुगोपाल कलंत्री, सह-खजिनदारपदासाठी सीए शुभम राठी तसेच सह-सचिवपदासाठी दर्शन भंडारी यांनी उमेदवारी दर्शविली. सर्व पदांसाठी एकमेव उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्याने सर्व पदा मंडळाचे अध्यक्ष म्हणून मनीष मालपाणी यांची सलग २२ व्या वेळेस निवड करण्यात आली. यावर्षीच्या निवडणुकीतील विशेष आकर्षण ठरले ते कार्याध्यक्षपदी निवड झालेले सागर मणियार. आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून संगमनेरमध्ये परिचित असलेले मणियार सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय, ऊर्जावान व मितभाषी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. कोणत्याही कार्यक्रमात प्रत्येक सदस्याचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करून कार्यक्रम यशस्वी करण्याची त्यांची हातोटी विशेष मानली जाते. त्यांच्या व्यापक मित्रपरिवारामुळे आणि संघटन कौशल्यामुळे मंडळाच्या विविध उपक्रमांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास सदस्यांनी व्यक्त केला. मंडळाच्या ७५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीनंतर सुरू झालेल्या ७६ व्या वर्षात सागर मणियार यांच्या नेतृत्वाखाली मंडळ अधिक जोमाने सामाजिक कार्य करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नवीन कार्यकारिणीची घोषणा झाल्यानंतर अध्यक्ष मनीष मालपाणी यांनी सदस्यांना मार्गदर्शन केले. यंदा १२ दिवसांचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून त्याअंतर्गत सहा दिवसांचा 'संगमनेर फेस्टिव्हल' आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक व जनहिताचे उपक्रम राबविण्याचा निर्धारही व्यक्त केला. यावेळी मंडळाचे सभासद अनीश मणियार, मधुसूदन नवंदर, सम्राट भंडारी आणि सुदर्शन नावंदर यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून आगामी उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. नवीन कार्यकारिणीच्या निवडीमुळे राजस्थान युवक मंडळाच्या सामाजिक कार्याला नवी ऊर्जा मिळणार असून मंडळाच्या आगामी वाटचालीबाबत सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# जोर्वे गावचा अभिमान

## यशदीप दिघे यांची लेफ्टनंटपदी नियुक्ती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जोर्वे येथील सेवानिवृत्त सैनिक राजेंद्र रावसाहेब दिघे यांचे चिरंजीव यशदीप उर्फ सनी राजेंद्र दिघे हे देहरादून येथून एनडीएचे प्रशिक्षण पूर्ण करून देशसेवेसाठी लेह लडाख येथे लेफ्टनंट पदावर आर्मीमध्ये कार्यरत होणार आहेत.

जोर्वे येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजेंद्र दिघे यांनी भारतीय सैन्यामध्ये २७ वर्ष सेवा दिली. ज्या दिवशी ते निवृत्त झाले त्याच दिवशी त्यांचा मुलगा यशदीप याची एनडीएमध्ये निवड झाली. हा मोठा योगायोग होता यशदीपने पुणे येथील खडकवासला येथे तीन वर्षाचे ट्रेनिंग पूर्ण केल्यानंतर एक वर्ष देहरादून येथे आपले प्रशिक्षण पूर्ण केले.

भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू व विविध केंद्रीय मंत्री मुख्यमंत्री यांच्या देहरादूनच्या एनडीए अकॅडमीमध्ये उपस्थितीमध्ये एनडीएचा पदग्रहण समारंभ मोठ्या शानदार पद्धतीने संपन्न झाला. यावेळी यशदीपचे वडील मेजर राजेंद्र दिघे, आई सौ.पूजा दिघे, व प्रांजल दिघे यांच्यासह कुटुंबीय उपस्थित होते. लहानपणापासूनच भारतीय सैन्यातून देशसेवा करण्याचे आपले स्वप्न होते. ते पूर्ण झाले असल्याची भावना यावेळी लेफ्टनंट यशदीप दिघे यांनी व्यक्त केली. ते लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे जनसंपर्क अधिकारी नामदेव कहांडळ यांचे भाचे आहेत.

लेफ्टनंट यशदीप दिघे यांच्या यशाबद्दल महाराष्ट्राचे मा. महसूल बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, दुर्गाताई तांबे, इंद्रजीत थोरात, डॉ.जयश्रीताई थोरात, शरद नाना थोरात, पुंजाहरी दिघे, सुरेश थोरात, शेती संघाचे मॅनेजर अनिल थोरात, रावसाहेब दिघे, अर्जुन दिघे, सर्जेराव दिघे, प्रभाकर रामकर, सोमनाथ रामकर, गणेश कहांडळ, सुनील थोरात, सतीश कहांडळ, राजेंद्र कहांडळ, संजय खैरनार यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# दारूबंदीसाठी आता आंदोलनाचा निर्धार

## हेरंब कुलकर्णी यांची अध्यक्षपदी निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- पोलीस उत्पादनशुल्क यांच्या हप्तेखोरीमुळे दारू थांबत नसल्याने वर्षानुवर्षे तीच माणसे त्याच गावात दारू विकत आहेत. त्यामुळे ज्या गावात दारू विकली जाते तेथील तरुण महिलांना आक्रमक करून पोलीस व उत्पादनशुल्क यांना जाब विचारत दारू आणि गुटखा बंद करण्याचा निर्धार दारूबंदी आंदोलनाने व्यक्त केला. तालुक्यातील अनेक गावांतील कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते. बैठकीनंतर सर्व कार्यकर्त्यांनी अकोले पोलीस स्टेशनला जाऊन सर्वांच्या सहीचे निवेदन देऊन ज्या गावात अवैध दारू विकली जाते त्या गावातील पोलीस पाटील व बीट अंमलदार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली.

आंदोलन प्रभावी करण्यासाठी आज अकोले तालुका दारूबंदी आंदोलनाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. प्रत्येक गावात जाऊन तेथे तयार निश्चित आले. तालुका कार्यकारिणी करण्याचे करण्यात अकोले दारूबंदी आंदोलनाचे अध्यक्ष म्हणून हेरंब कुलकर्णी यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी डोंगरगावचे सरपंच दशरथ उगले, म्हाळादेवी चे अनिल मुठे, भाऊसाहेब नाईकवाडी उपस्थित होते.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
● हृदयरोग (Heart Diseases)
● मेंदूरोग (Brain Diseases)
● कर्करोग शस्त्रक्रिया
● अपघात (Accident)
● लहान बालकांची शस्त्रक्रिया
● गुडघ्याचे प्रत्यारोपण
● विद्युत अपघात रुग्ण
● कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
● डायलिसिस
● अपघात शस्त्रक्रिया
● खुबा प्रत्यारोपण
● मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25